म. ग्रं. स. ठाणे.
विषय काव्य
स. क्र. ३५२

REFBK-0003163

र. ए. चनुभ
REFBK-0003163

श्री ॐ || दि. क्र. 3983

काव्यकिरणमाला- किरण ३ रा.

# मान्यांची यमुना.

( खंडकाव्य )

लेखक- दु. आ. तिवारी

सं. व. प्र.- मि. का. भोरटके

बलिप्रतिपदा शके १८४८

ता. ६ नोव्हेंबर १९२६

( सर्व हक्क ग्रंथकर्त्याकडे )

किंमत ८६

# काव्यकिरणमाला.

**सं. व. प्र.:- मि. का. भोरटके.**

## वर्गणी ५ रु. ८ आ.

वरील वर्गणीतून मालेची ०-१२-० प्रवेश फी. ... आतां बाकीच्या ४ रु.-१२ आ. ० ची फेड सरा-सरी तीन महिन्यानें पुस्तकरूपानें केली जाईल. मालेंतून प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांची किंमत चार आण्या-पासून आठ आण्यापर्यंत ठेविली जाईल. मालेच्या ग्राह-कास मालेचें प्रत्येक पुस्तक पाऊणपट किंमतीस मिळेल.

जळगाव पूर्वखानदेश.

मुद्रकः-

नारायण नरसिंह फडणीस

बालाजी स्टीम प्रेस जळगांव

# प्रकाशकाचें निवेदन.

काव्यकिरणमालेचा प्रथम किरण 'महाराणाप्रताप-सिंह' प्रकाशित झाल्यावर 'चंडीशतक' (श्री. तिवारीकृत) हा द्वितीय किरण प्रसिद्ध करण्याचें ठरलें होतें. व त्याप्रमाणें चंडिशतक काव्य मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यांत पुण्याच्या आर्यभूषण प्रेसाकडे छपाईकरितां रवाना झालें. पण त्यानंतर लवकरच आठ दिवसांत आर्यभूषणावर जो अग्निप्रळय झाला त्यांतून हा किरण बचावला ही आनंदाची गोष्ट! तथापि आर्यभूषण प्रेसाची पुन्हां स्थिर-स्थावर होईपर्यंत थांबणें भाग आलें. शिवाय या चंडी-शतकांत पद्मबंध, मुरजबंध, हारबंध वगैरे २४ चित्राकृति असल्यामुळें त्यांचे ब्लॉक वगैरे करण्यास अपेक्षेबाहेर वेळ लागूं लागला. ह्मणून महाराष्ट्रसत्कवि श्री. दु. आ तिवारी यांनीं गेल्या मे महिन्यांत "मान्यांची यमुना" नांवाचें जें गोड खंडकाव्य लिहिलें तें तृतीय किरण ह्मणून तत्काळ ग्राहकांच्या हातीं देण्यास फावलें. प्रस्तुत काव्या-ची मांडणी इतकी सहज व हृदयंगम आहे कीं, महाराष्ट्र काव्य-रसिकांस तें निःसंशय आकर्षक वाटेल. थोडा वेळ झाला तरी असा सुंदर किरण मालेंतून प्रकाशित होत आहे ही समाधानाची गोष्ट आहे.

जळगांव
जयादशमी शके १८४८
१६।१०।२६

मि. का. भोरटके

# दोन शब्द.

सातमळा (अजिंठा) डोंगराच्या रांगेत ब्रिटीश व निझाम यांच्या सरहद्दीवर वाडीचा प्रसिद्ध किल्ला आहे. या किल्ल्याचें ऐतिहासिक दृष्ट्या फार महत्व आहे. येथें कित्येक मराठी घराण्यांनी राजसत्ता गाजविली असून त्यांचे वंशज अजून भोंवतालील गांवांत आहेत. ज्यांची वर्णनें या काव्यांत आलीं आहेत तीं तीं स्थानें अद्याप पूर्वस्मृति देत आहेत. तें रुद्रेश्वराचे स्थान, तेथून निघणारी ती सोन नदी, तें गळवाडें, सोयगाव, चिंचपूर हीं गांवें आजही पहावयास मिळतील व माने, शिर्के यांचींही नांवें ऐकूं येतील.

येथील माझे कविमित्र श्री. केशवराव सोनाळकर, श्री. कवि-काव्यानंद (शि. स. शिर्के बी. ए., अ. ऑफिसर पू. खा.) व काव्यरत्नावलींचे संपादक श्री. नानासा. फडणीस यांस हें काव्य लिहून झाल्यावर मी दाखविलें होतें. त्यांच्या प्रसन्नतेचें मी आभार मानतों. कविमित्र काव्यानंद यांनीं ज्या योग्य सूचना केल्या त्याविषयींही मी त्यांचा आभारी आहें.

बावजी स्टीम प्रेसच्या चालक वर्गांतील वासुदेवराव फडणीस व माधवराव मग्रे यांनीं या बुकाचें काम काळजीनें व लवकर केलें याविषयीं ते प्रशंसेस पात्र आहेत.

विजयादशमी शके १८४८
१६।१०।२६
जळगांव पू. खा.

दु. आ. तिवारी.

# " मान्यांची यमुना. "

## ( कथानक. )

खान्देशाच्या दक्षिण अंगास सातमळा ( अजिंठा ) पर्वताची रांग आहे. त्यात वाडीचा किल्ला प्रसिद्ध आहे. तेथें माने उपनावाचे राजे राज्य करीत होते. पवार हे मान्यांचे आश्रित होते. पवारांनीं स्वामिद्रोह करून मान्यांच्या राजपुरुषास ठार मारिलें व किल्ला आपल्या ताब्यांत घेतला. नंतर किल्ल्यावर पवारांचा अंमल सुरू झाला.

किल्ल्याच्या खालीं गळवाडे नावाचें गांव आहे. तेथें यमुना व जयवंत हीं मान्यांचीं दोन मुलें आपल्या मामाकडे आश्रयार्थ राहिलीं. त्या दोघां बहीणभावांना आपल्या पूर्ववैभवाचें वारंवार स्मरण होई. त्या पर्वतराजींत रुद्रेश्वर ह्मणून शंकराचें स्थान आहे. तेथून सोन नदी निघते या सोन नदीच्या तीरीं एके दिवशीं जयवंत उदासीन वृत्तीनें एकटा बसला होता त्याला शिरक्यांचा पुत्र मुरार यानें शोधून त्याचें स्मृतिदुःख ऐकून व समाधान करून घरीं आणिलें. जयवंतानें त्या दिवशीं मुरारीला आपल्या घरीं आग्रहानें जेवावयास ठेवून घेतलें.

त्या दिवसापासून मुरार व जयवंत या दोघाचा स्नेह आणि यमुना व मुरार या दोघांतील प्रेमभाव वाढत गेला. माने व शिर्के यांचा निष्कृत्रिम स्नेहभाव होता. मान्यांसाठीं शिरक्यांनीं आपल्या माना सुमहांगणात्त अर्पण केल्या होत्या. पण मान्यांच्या या शेवटच्या दुर्दैवाला शिरक्यांचा हात निवारूं शकला नाहीं. मुरारीच्या अंगीं आपल्या पूर्वजांचा स्वामिभक्ति हा गुण उत्कटतेने वास करीत होता. वाडीचा किल्ला पवारापासून

पुन्हां परत मिळवावयाचा असा त्यांनीं आपल्या मनाशीं बेत योजून ठेवला.

मुरार व जयवंत या दोघाचें व्यायामस्थान होतें. तेथें त्यांचे निरनिराळ्या प्रकारचे युद्धोपयोगी खेळ होऊं लागले. आणि इतरही मराठ्यांचीं तरुण मुलें तिथें जमूं लागलीं. एकदां ही सर्व मंडळी शिकारीला गेली. तिथें जयवंत एका वाघिणीवर भाल्याची फेक करीत असता घोड्यावरून खालीं पडला! अशा जिवावरच्या प्रसंगीं मुरारीनें वाघिणीवर उडी घालून तिला ठार केलें. पण त्या झटापटींत तिनें मुरारीला इतक्या जखमा केल्या कीं, मुरार रुधिरक्षीण होऊन मूर्च्छित झाला!

मुरारीच्या या दुखण्यांत यमुना व जयवंत यांनीं मुरारची चांगली शुश्रूषा केली. विशेषतः यमुनेच्याच हाताचा मुरारीला गुण आला! त्याच गांवांत इतर जीं मराठ्यांचीं कुळें होतीं त्यांत मोरे उपनांवाचे मराठे होते. मोऱ्यानीं आपली मुलगी मोहना, मुरार शिरक्याला द्यावयाचें ठरविलें. मुरारीनें जेव्हां घरांत ती चर्चा ऐकली, तेव्हा तो चलित मनानें जयवंताकडे आला. तों मोऱ्यांच्या बोलावण्यावरून जयवंत मोऱ्यांकडे नुक-ताच गेल्याचें त्याला यमुनेकडून कळलें. जयवंतामार्फत हें कार्य अवश्य जुळेल असें मोऱ्यांना वाटलें होतें.

जयवंत मोऱ्याकडे गेल्याचें ऐकून मुरार खिन्न झाला. यमु-नेनें कारण विचारता त्यानें—

॥ मोरे शिर्के यांचा यमुने! शरीर संबंध—
जोरे घडला तरि तुटतिल माझ्या हृदयाचे बंध ॥

असा आपला हेतु स्पष्ट केला. इतक्यात जयवंत आला व त्यानें, "मोऱ्यांचा जामात! म्हणून मुरारीला संबोधिलें मुरारीला तें रुचलें नाहीं. जयवंताच्या मनांत आपली बहीण शिरक्यांच्याच

कुळांत थावयाची होती; पण आतां त्यास तसें उघड बाल- वेना; तरी ! त्यानें आपला हेतु संदिग्धतेनें या प्रसंगीं व्यक्त केला. मुरारीनें खूण करून जयवंतास बाहेर फिरावयास नेलें. तिकडे त्यानें जयवंतास आपला मनोदय सांगितला असावा. कारण त्या दिवसापासून मोरे व शिर्के यांच्या शरीर संबंधाची वार्ता वातावरणात विरून गेली.

आपणा करितांच मुरारीनें मोऱ्यांच्या मोहनेची माळ दूर सारिली, या जाणिवेनें यमुना मुरारविषयीं अधिकच आदरमय झाली. ती एके दिवशीं फुलबागेंत फुलें वेंचित असता तिथें मुरारीनें तिची भेट घेतली व आपला प्रेम-भाव व्यक्त केला. तिनें अनुमति-युक्त पण विकल उत्तर दिलें कीं- या वाडीच्या कि- ल्ल्यावर माझ्या परलोकवासी पित्याच्या किंकाळ्या माझ्या कानीं येत आहेत. मी बोहल्यावर कशी चढूं आणि हातात माळ कशी धरूं ? आपण या किल्ल्यावर मान्याचा ध्वज उभारून विजयश्रीची माळ घालून या म्हणजे मी आपली माळ तुमच्या गळ्यात घालीन. आजपासून तुम्हांवांचून मी जगताची भगिनी झालें आहें असेही तिनें सांगून टाकलें. पवारांपासून किल्ला घेण्याची प्रतिज्ञा करून मुरार निघून गेला. तेव्हांपासून तो व त्याचे मित्र यांच्या गुप्त मंडळ्या दऱ्याखोऱ्यांत जमूं लागल्या. घोरपडे, थोरात, मोहिते माधव, देशमुख वगैरे सर्वांनीं आपापले लोक मदतीस आणावयाचें कबूल केलें. होळी विझल्यावर अमावस्येच्या काळोखांत जयवंतानें घोरपडीनें किल्ल्यामागून आपले लोक चढवावयाचे व दरवाजा- पुढें जयवंतानें उभें राहून तो उघडतांच आत शिरावयाचं असा बेत ठरला

मुरारी शिकारीच्या जखमांनीं अत्यवस्थ असतां यमुनेनें रुद्रेश्वराला नवस केला होता. महाशिवरात्रीच्या उत्सवप्रसंगीं ती रुद्रेश्वरास गेली असतां तेथें पवारांच्या युवराजानें तिचें

सौंदर्य पाहिलें. दुसऱ्या दिवशीं पवारांनीं मंड्यामार्फत यमुनेस मागणी घातली, ती मुरार व जयवंत यांनीं पवारांचा धिःकार करून अव्हेरिली.

पवारांना यांच्या गुप्त सभेच्या बातम्या कळल्या. ज्या दिवशीं रात्रीं किल्ल्यावर छापा घालण्याचा शेवटचा बेत या सभेंत चालला होता. त्या रात्रीं बातमी ठेवून पवाराच्या घोड-दळानें छापा घालून जयवंताला धरिलें व किल्ल्यावर नेलें. मुरार मात्र निसटून गेला. जयवंताला सकाळीं राजद्रोही ठरवून कडे-लोटाची शिक्षा दिली. ती दुसऱ्या दिवशीं अमलांत यावयाची होती. हें ऐकून यमुना दुःखाच्या डोहांत बुडून गेली.

त्या रात्रीं मुरारीनें अंकाईच्या कड्यावरून आपले लोक घोरपडीनें वर चढविले व किल्ल्यात हल्ला केला. तोफखाना जिंकला, पवाराची नौबत बंद पाडली व गडकरी हतवीर्य केले, मुरारीचे साथिदार शिंदे, यांनीं ऐन वेळीं किल्ल्याचे दरवाजे उघडे केले, तेथें किल्ल्याच्या दारापुढें घोरपडे होते ते आपल्या मर्द साथिदासह आंत शिरले. त्यांना गडकऱ्याशीं झुंज घाव-यास लावून मुरारीनें खाशा उदोपवाराशीं गाठ घातली आणि त्याचा शिरच्छेद केला. पवारांचा मुलगा पुढें आला त्याचेंही प्रेत बापाच्या प्रेतावर पाडिलें. नंतर त्यानें कारागृहाकडे धांव घेतली. तेथें आपला मित्र जयवंत याला त्यानें बंधमुक्त केलें. ते दोघे एकमे-कांस कडकडून भेटले. मग जयसूचक तोफांची सरबत्ती करवून मुरारीनें वाडीच्या किल्ल्यावर मान्यांचा यशोध्वज उभारिला.

सकाळीं यमुनेला घ्यावयास किल्ल्यावरच्या पालख्या निघा-ल्या. यमुना पालखींत बसून किल्ल्यावर आली तिघांच्या भेटी झाल्या. जयवंतानें पूर्वजांस स्मरून आपली भगिनी यमुना हिचा हात मुराराच्या हातात दिला. पुढें वैशाखांत त्याचें लग्न लागलें.

—:O:—

# मान्यांची यमुना.

## भाग १ ला

क्र. 3983 (स्थळ प्रत)

शैलस्थानाचें वर्णन, किल्ल्याची माहिती, यमुना व जयवंत यांचें परस्परांवरील प्रेम, सोन नदीच्या उगमस्थानाचें वर्णन, सोन नदीच्या तीरावर जयवंत एकटाच गतवैभवाचें स्मृतिदुःख करीत बसला, त्याला शोधीत त्याचा मित्र मुरार शिर्के हा आला; त्यानें विचारल्यावरून जयवंतानें त्यास आपलें अंतर्दुःख सांगितलें. मुरारीनें दूरदृष्टीचे व दृढ प्रतिज्ञेचे आपले विचार त्यास सांगितले व त्याचें समाधान केलें.

( " चंद्रकांतराजाची कन्या " या चालीवर )

**शैलस्थान:—**

भव्य पसरली पर्वत-राजी नील—नभस्पर्शी,
उत्तर—दिग्वासी लोकांचे नेत्र समाकर्षी.
विशाल खोरीं, दऱ्या भयानक, वन्यपशुस्थानें
वृक्षलतांचीं निबिड मातलीं चहूंकडे रानें.
कोठें दिसते सखल भूमिका, कोठें मैदान.
कडे कोसळुन कितीक पडले काळे पाषाण.

हिरवीं शेतें नयनीं दिसती नव्या गव्हाळीचीं
शेतकऱ्याची दृष्टि ज्यावरी पुढच्या आशेची
कुणी टेकडीवरी गुराखी पावा वाजवितो
माळावर कुणि चढून कुणबी गोफण फिरवीतो
स्वच्छदानें निर्झर धांवति निर्मळ सलिलाचे
जणों खेळती बाळ अंगणीं पर्वत राजाचे
तळभागीं निर्झरिणी वाहे तरुवेलींतून
शीतल वायू मंद वाहतो दिशादिशातून

## वाडीचा किल्ला.–

तिथें विलसतो तटबंदीचा ' किल्ला वाडीचा '
पाहुन त्यातें चित्तीं वाटे दिग्गज तो साचा
अर्धकोस चढणीवर बावन बुरुजांचा घेर
स्वातंत्र्याचा कमरबंद जणु उभा शिलेदार
मान्यांच्या शौर्याची नौबत दुमदुमली जेथें
पवार राजे शौर्य-मदानें करिति राज्य तेथें !
मान्यांच्या वंशास जयानीं दिधला सन्मान
तेच पवारांपुढें आपुली वांकविती मान !
तळवटातलीं शूर घराणीं मर्द मराठ्याचीं
स्वामिभक्तिनें वैभवगीतें गातीं मान्याचीं

यमुना व जयवंतः–

गळवाड्याला[1] मातुल-गेहीं मान्यांची यमुना
बंधुसवें आठवीत होती विभवाची दैना
सौंदर्याची कोमल कलिका चौदा वर्षांची
मूर्तिमंत ती बाल-कमलिनी नव-शृंगाराची
यमुनेच्या भालावर बघता चंचल अलकास
वाटे सुंदर यमुनेचा तो जल-लहरी-भास
निजवंशाची कीर्ति–देवता बाला मूर्तिमती
वर्धमान चंद्राची कोरहि तिज लाजत होती
फुलोऱ्यास येणारी सुंदर आश्विन–वनसृष्टी
तीहि तशी आकर्षी मुग्धा जनतेची दृष्टी
ज्येष्ठ बंधु जयवंत, तयाचा जीव तिच्यावरती
जननि-जनक दोघांची स्मृति तिज घडू न दे चित्तीं
रसरसणारा कीं नव-अंकुर भग्न-तरूचा तो
झुळझुळणारा शुष्क–तडागामधील निर्झर तो
कीं विझला शौर्याग्नि, तयाचा स्फुलिंग हा साचा
अथवा उरला एक मात्र मणि सुंदर हाराचा
हृदयाच्या हिंदोळ्यावरती बसवुन भगिनीला

1 किल्ल्याच्या खालील गावचें नाव.

आयुष्याच्या पहिल्या प्रहरीं रमवी तो तिजला
तो कोठें जरि बाहिर गेला, हिजला करमेना
कितीक वेळा दारीं येउन वाट पाहि यमुना
दिसला कुणि जरि दादासम तिज, रेखुन ती पाही
नेत्रामधल्या प्रसन्नतेला नेत्रीं ती चिरवी !
दाराशीं पाऊल वाजतां झर झर येई ती
निज–भगिनीच्या पवित्र हास्यीं बंधूची शांती
तिला पाहतां पडदे सरती त्याच्या दुःखाचे
त्यास पाहता तिच्या वितळती ढग औदास्याचे
तीं भावंडें कधीं दिसावीं क्रीडोद्यानांत
कधीं दिसावीं बागेमध्यें पुष्पवाटिकेंत
नेत्र पुसावे त्यानें अपुल्या दुःखित भगिनीचे
परि त्याचे त्यासहि नावरती जलौघ अश्रूंचे !
त्यास आठवे निज-जनकाचा झालेला घात
जननीनेंही देह टाकिला विरही कुंडात
सुख--स्वप्न हरपलें राहिली दुःखाची रजनी
नृपलक्ष्मीचीं बाळें झालीं आज दीनवाणी !
तोच आपुल्या हृद्‌दुःखाचीं दारें लावोनी
तिला शांतवी परोपरीनें प्रेमळ वचनांनीं

सुंदर पक्षी दावी, लतिकेजवळ तिला नेई
विसर पडावा तिला ह्मणोनी फुलें खुडुन देई

**सोननदीः-**

पर्वतराजीमधें स्थान जें श्रीरुद्रेशाचें
सोन नदीच्या जन्मकालच्या बालक्रीडेच
कृष्णशिलामय कड्यावरोनी उतरे गिरि-बाला
स्वर्गांतुनि भागीरथि भेटे जणु रुद्रेशाला
सरित्प्रपातें तुषार उडती वृक्षलता-पर्णी
उत्सवास पातल्या तारका काय शुभ्रवर्णी ?
तलभागाचे खडक फुटोनी त्या सरितौघानें
तडाग झाला, तेथें येतीं तृषार्त वनहरिणें
सरस्तटांतुनि वेगें धांवे दुहिता शैलाची
स्फूर्तिजन्य कीं कविता-दुहिता सत्कविरायाची
खळ खळ नादें अव्यक्ताचीं ती गाई गाणीं
संतोषोनी गिरि-वनसृष्टी हांसे कुसुमानीं
पुष्पवृक्ष जे पर्णवृक्ष जे हिरव्या छायेचे
वन-विहगांचे तिथें चालले खेळ विलासाचे
कोठें बसला शुभ्र बकाचा समूह निस्तब्ध
कोठें करितो हरित शुकांचा समूह कल-शब्द

सोन नदीचें होतें इतुकें तेजस्वी पाणी
वीर-कुलीं चढविलें तियेनें शौर्याचें पाणी
स्वातंत्र्याच्या रणीं वाहिल्या रुधिरांच्या सरिता
साक्षी तेथें एकच होती ती पर्वत-सरिता

**जयवंताचें स्मृतिदुःखः—**

तत्तीरावर निर्जन-भागीं छायेच्या खालीं
बसला कोणी तरुण एकला दुपारच्या वेळीं
विचार शिरले अनेक शीर्षी झाला तद्भार
म्हणुनि दिला जणु निजहस्ताचा शिरास आधार
उन्मुख होउनि दुर्गावरि करि तो दृष्टि-क्षेप
तन्निश्वासीं कितीक भरले स्मृतिचे आलाप
" याच गडावर गर्जत होते मान्यांचे सिंह
इथेंच वायूसवें डोलला ध्वज अमुचा भव्य !
या किल्ल्याचे या दुर्गाचे उघडुनि दरवाजे
काळावरती धावत गेले मान्याचे राजे !
रणशिंगाच्या ' धुतुतू धुतुतू ' ऐशा तालात
हुतुतूच्या मारिल्या ल्दाया ' हर हर ' घोषांत !
गजांत-लक्ष्मी डोलत होती अमुच्या दाराशीं
आता आह्मी दिवस कठितों परक्या दाराशीं !

खड्ग असो परि मान्यांच्या खड्गाचेंही म्यान
दिसो कुठेंही त्यास लाभला अखंड सन्मान !
बोलत होते लोक हिला ही 'वाघाची वाडी'
परवशतेचीं प्रेतें येथें स्वतंत्रता पाडी !
येथें जिरला निझामशाही सत्तेचा गर्व
मनगटास चावीत परतले मोंगलही सर्व !
जातीच्या सर्पांनीं केला घरभेदी कावा
मृत्यूच्या दारांत साधिला बाबाचा दावा !
सातमळ्यातिल गढकोटाच्या तोफांचे गोळे
सातपुड्याच्या हृदयीं देती भीतीचे झोले !
गुलाम होते भोगित सुख जे कृपा-प्रसादाचें
स्वामिद्रोही कृतघ्न झाले धनि ते गेहाचे !
होम करूं का निज-वंशासह पवार-वंशाचा ?
सूडाचा ध्वनि कर्णीं घुमतो पूर्वज-वीरांचा !
कृष्ण घनातरिं तेजोवलयी चपला चमकावी
सागरांतरीं लहरी-माला भीषण उसळावी-
वावटळीचे लोट उठावे भयाण आकाशीं
विचार तैसे किती व्यापिती त्याच्या हृदयाशीं
तरुण-रक्त तापलें, तरुण तो झाला बेभान

तोंच ऐकिला निज-नामध्वनि सुखावले कान
तो जीवाचा मित्र मुरारी शिरक्याचा पुत्र
संकट—समयीं जयवंताच्या स्नेहाला पात्र

**मुरारची भेट—**

" दुपारपासुन तुला शोधितों आह्मी जयवंत !
तुझ्या जीवाला युक्त वाटला निर्जन—एकांत ?
' दादा दिसला होता का ? ' मज यमुनेनें पुसिलें
तोंड फिरविलें हळूच अपुल्या नेत्रांना पुसिलें !
मी थोडासा विस्मित होउनि ' नाहीं ' वदताच—
कारुण्याची मूर्ति बघवली नाहीं मज साच !
उच्च पठारें, ओढे, नाले, करवंदी जाळ्या
शिला-विषम त्या किती शोधिल्या खोल दऱ्या सगळ्या !
कुकल्पना माजल्या, मिळेना शांति क्षण एक
निष्फळ-यत्नीं हताश-बुद्धी होते साशंक

**जयवंताचें हृदयनिवेदन:—**

आत्मीय प्रेमानें गेला विरून जयवंत
बोलूं लागला ठेवुन त्याच्या खांद्यावर हात
" गड्या ! मुरारी ! मान्याच्या इतिहासाचीं पानें
भिजवित होतों एकांतीं नेत्राच्या सलिलानें

हे जे दिसती तुजला पर्वत विशाल देहाचे
करिति साम्य मध्दृदयांतरिंच्या दुःख-पर्वतांचें
भग्न मनाचे बांधुन तुकडे हृदयाच्या वस्त्रीं
दैव-दरिद्री विषण्ण वळलों गिरिजेच्या पात्रीं
आंत भडकला वणवा कैसा दाऊं कोणाला
सांग कोणत्या तरी उपायें शांतवुं चित्ताला ?
दुर्ग नव्हे हा, कीर्ति-समाधी अमुच्या वंशाची
हिच्यांतुनी किंकाळी येते कानीं बाबांची !
थरारती रोमांच शरीरीं, बाहु स्फुरतात
'मर मर' हा घुमतो ध्वनि मम निश्वासें हृदयात"
तरुणाचा परि दूर दृष्टिचा, दृढ प्रतिज्ञेचा—
बोध ऐकिला जयवंतानें मित्र मुरारीचा. ७२

# भाग २ रा.

जयवंत व मुरार दोघेही सायंकाळच्या वेळी घराकडे परतले, यमुना दारीं उभी होती, भावास पाहून तिला आनंद झाला. मुरारविषयीं तिच्या मनांत आदर उत्पन्न झाला. घरात दोन पिकलेलीं रामफळें होतीं, तीं तिनें त्या दोघांपुढें आणून ठेविलीं. मुरारानें आपल्या फळातील अर्धा भाग यमुनेस दिला. जयवंतानें मुरारीला त्या रात्रीं आपल्याच घरीं भोजनास ठेवून घेतलें. त्या दिवसापासून मुरार व जयवंत यांचा स्नेह दृढ झाला आणि मुरार व यमुना यातील प्रेमभाव वाढत गेला. यमुनेनें मुरार व जयवंत यांजकरिता दोन रुमाल विणिले, त्यावर त्यांचें त्यांचें नाव साधलें व ते दोघाना दिले. मुरारच्या रुमालावर तंतुच्छायेंत ' य मु ना ' असे वर्ण तिनें मोठ्या कुशलतेनें साधिले होते.

## संध्या वर्णन:—

संध्या-समयीं गृहीं परतले ते दोघे तरुण
बलशाली जणु सिंह चालले गुहेकडे दोन !
अस्त-रवीच्या किरणाचा गिरि-शिखरावर लेप
सोनेरी जणुं शिरीं चढविले कीं पिवळे टोप !
शैलांतर्भागात पसरली शैलांची छाया
वनावनातुनि पक्षि लागले कोटरिं परताया
मधें थांवती पुन्हा धांवती हरिणाचीं बाळें
वानर-सेना उंच उचशा वृक्षावरि खेळे

चढणीवरुनी उतरुं लागले गाईंचे कळप
वातावरणीं घुमताती वेणूंचे आलाप
कुणी चालला कुणबी हांकित मोटेची जोडी
उडवित हौशी कुणी चालला अलबेली घोडी
कामकरी उचलुनी शिरावरि भारे गवताचे
त्वरेत्वरेनें संनिध करिती स्थान विसाव्याचें
फळभाज्यांच्या शिरीं टोपल्या घेउनिया तरुणी
मळ्यातल्या माळिणी चालल्या पादपथांतूनी
रजःकणांचें पटल पसरलें अंबर-भागात
वर्षा नसतां धुकें पसरलें जणुं भूगोलांत
स्वार मराठी शूर शिकारी वळले किल्ल्यांत
दिसति गडकरी रात्रपाळिचे बुरुजाबुरुजांत

## जयवंत मुरार व यमुनाः—

त्या शोभेचे प्रेक्षक दोघे मुरार-जयवंत
अभिन्न-हृदयीं शोभविताती निज-सदनोपात
यमुना दारीं उभी, देवता बंधुप्रीतीची
क्षीणप्रभ जणुं शशांक-लेखा शुद्ध द्वितियेची !
पवित्र निर्मळ तारा हसली शुभ्र कपोलाची
शांतीच्या तीरास लागली चिंता नौकेची !

करी जरी अग्रज बहुपरिनें समजावणि तीची
प्रश्न-मालिका तिची न सरली कोमल वचनांची !
निज-बंधुस्तव दुपारपासुन जो शिणवी काया
त्याची तिजवर नकळत फिरलो उपकृतिची छाया !

'मुरारवांचुन अतां कुठेंही फिरूं नको दादा!'
प्रकटे कोमल भाव, तिचा जरि बोल निघे साधा
घरात होतीं जीं पिकलेलीं रामफळें दोन
दोघांपुढतीं एका पात्रीं ठेवी आणून

मुरार अपुल्या फळांतुनि दे तिज अर्धाभाग
हृदय-पथावरि नकळत पडला प्रीतीचा माग !
निरोप घेई सदनिं जावया मुरार दोघांचा
आग्रह केला जयवंतानें त्यास भोजनाचा

उल्लंघवतें अगाध विस्तृत तीरहि सिंधूचें
उल्लघवतें सांगा कोणा वचन प्रीतीचें ?
संकोचें मित्रास बोलला जो 'नाहीं नाहीं'
यमुनेच्या पहिल्याच वचाला अनुमति तो देई !

"सांगुन येतों आईला घरिं पाहिल ती वाट
चिंतेनें भिजवील आपुल्या नेत्राचे काठ." !

## मुरारचें प्रेमातिशय:-

जवळच होतें गेह तयाचें उदार चरिताचें
ग्रामवृद्धही कौतुक करिती ज्याच्या शीलाचें
मान्यांच्या वंशाशीं होता शिरक्याचा स्नेह
परस्पराचा जनविश्रुत तो निष्कृत्रिम भाव
शिर्के ह्मणजे मान्यांच्या जय-खड्गाची धार
शिर्के ह्मणजे मान्यांच्या दौलतिचा आधार !
मान्यासाठीं कितीक तुटल्या शिर्क्यांच्या माना
शाहिराच्या कंठीं चढल्या गीताच्या ताना !
वाडीच्या किल्ल्याच्या पुढतीं जी तांबडमाती
शिरक्याच्या रुधिरानें सारी भिजलेली होती !
स्वामिभक्तिचा कृतघ्नतेनें केला अपघात
दुर्दैवाला वारुं न शकला शिरक्याचा हात !
राजकुलाचें रक्षण अपुलें पवित्र कर्तव्य
मुरार-जीवनचरिताचा हा पाठच कीं दिव्य
समान वय, शौर्याचे सद्गुण समान दोघांचे
स्नेहांकुर वाढले साहजिक त्या कुलवंताचे
मुरार जयवंतासह बसला रसज्ञ जेवाया
रसिक विवेकासह सजला कविता-रस सेवाया

प्रेमातिथि तो 'पुरे पुरे' तृप्तीचा वच काढी
धवल करींच्या धवल शेवया हंसून ती वाढी !
त्या रसिकेचा पहिला आग्रह, रसिकहि तो पहिला
पुष्पाचा आघात कुणाला दुःसह का गमला ?
तांबुस पिवळी फुटे पालवी नूतन वृक्षांला
तैसे फुटले भाव मनोहर कोमल जीवाला
भावशुद्ध सिद्धीचा सेवक त्याची जी वृत्ती
मुरारिच्या वृत्तींत सर्व ती समावली होती !
गुणोद्रेक पाहता सभेची प्रसन्न जी दृष्टी
मोहकतेची दिसे तशी मधु यमुना-दृग्सृष्टी !
तो क्षण गेला, तारामंडित ती रजनी गेली
आशेची तारावलि फुलली सदैव ती ठेली !
त्या दिवसापासून जाहला दृढ त्यांचा स्नेह
वाढत गेला दोघामधला एकात्मक भाव.

**मुरारचें प्रेम:—**

दिसे मुरारी मनोविहारी यमुनेच्या तीरीं
तदंतरींही निर्मळ उठती प्रीतीच्या लहरी
मुरार जयवंताची प्रीती त्या मुग्धेवरची
समान होती, परंतु नावें भिन्न मात्र तीचीं

त्यानें तिजसाठीं आणावीं फुलें गुलाबाचीं
शेवंतीचीं निशिगंधाचीं किंवा जाईचीं !
गजरा त्यांचा तिच्या शिरावर त्यानें पाहावा
फुलवंतीच्या सुम-सौंदर्यें संतोषित व्हावा !
झाडावर पिकलेलीं आणी सिताफळें केव्हा
ताजे पेरू, ताजीं बोरें देई तो केव्हा
घरचा होता मळा उसाचा, गुऱ्हाळही तेथें
ताजा रस मागवी गड्याच्या तो केव्हा हातें
पेले देई ती रसवंती दोघांना भरुनी
भरी मुरारी तिसरा पेला आपण आणवुनी !
सणवाराचें कुळधर्माचें जेवण जें होई
त्या भावंडावीण न त्याचा घास मुखीं जाई !

यमुनेचें प्रेमचिन्हः—

जिथें मुरारी तिथें दिसावा सदैव जयवंत
जयवंताविण त्यास न करमे घरांत शेतांत !
ते दोघे जरि ऐन दुपारीं बाहेरुनि आले
मधुरभाषिणी साखरपाणी त्याच्यास्तव घोळे !
कुशलमतीनें चतुरकृतीनें रुमाल जे केले
त्याचें त्यांचें नाव गुंफुनी तयांस ते दिधले

मुरारचा तन्नामांकित जो रुमाल त्यावरती
'यमुना' ऐसें तंतु-च्छायातरीं वर्ण दिसती !
मूक प्रीती मूक रसिकता अभिनव-रसिकेची
बोलत होती तेथें भाषा मूक भावनेची !
सहज न दिसती प्रथम लोचनीं ते वर्ण स्पष्ट
शुभ्र घन-पटीं शुभ्र तारका जैशा अव्यक्त !
त्या ललितेच्या ललित कलेचा विलास जो तेथें,
निरीक्षणाची सूक्ष्मदृष्टि जी, धन्य करी तीतें
जयवंताहुन मुरार रक्षी नित्य रुमालाला
साधन होई तोच तयाच्या मनोरंजनाला !
स्वच्छ धुवोनी दोन्हीं टोकें धरुन वाळवाया--
उन्हांत होता उभा, दिसे तों ती वर्णच्छाया !
अनुरागाचा वृक्ष फुले अनुकंपाही डोले
विस्मयांतल्या गुणादराशीं सत्प्रीती खेळे !
शास्त्रज्ञाला जसा कळावा गहन नवा शोध,
नवोपमेचा काव्यलेखनीं कवीस आनंद,
खग-ज्योतिषी त्यास दिसावा तारा-पुंज नवा,
तसा तयाला मोद जाहला बघून त्या नांवा !
दिसावयाला जरी सारखे रुमाल दोन्हीही
प्रणयाची परि दिव्य खूण ती एकावर राही ५९

# भाग ३ रा.

मुरार व जयवंत यांचें एक व्यायामस्थान होतें. तेथें त्यांचे भाले बोथाटीचे युद्धोपयोगी खेळ चालत. हळू हळू इतर मराठ्यांचीं तरुण मुलेंही तिथें जमूं लागलीं. मुरार सर्वांस आवडूं लागला. एकदां ते सर्व शिकारिला गेले. तेथें एका वाघिणीची शिकार करितांना जयवंत घोड्यावरून खालीं पडला व तिच्या तावडींत सांपडला, इतक्यांत मुरारीनें उडी घालून वाघिणीस ठार केलें, पण त्या झटापटींत वाघिणीनें मुरारीला फार जखमी केलें; तो बेशुद्ध झाला ! घरीं आणल्यावर यमुना व जयवंत दोघांनीं त्याची चांगली शुश्रूषा केली, विशेषतः यमुनेच्या हातानेच मुरारीला गुण आला !

## रणोपयोगी शिक्षणशाळा:—

मुरार-जयवंताचें होतें व्यायाम-स्थान
भाले बोथाटीचे खेळति खेळ तिथें तरुण
समोरच्या खिडकींत बैसुनी गुणहौशी यमुना
क्रीडारंगणिं रंजवि अपुल्या गुणलोभी नयना
तरवारींचा वेढा पडला कैसा फोडावा ?
मुरारेनें चढवांनी पट्टे फाडुन दावावा
त्यावर होता सर्वजणांचा मारा जोराचा
अश्रु गळावा खळकन तेव्हां यमुना-नयनींचा !
तद्विजयातीं तिच्या दिसावा गालावर विजय
ती बघतांना क्रीडारंगणिं रंगुन तो जाय !

ॲंगोर फेरुनि लाठीवाले त्यानें फिरवावे
सांगीचे गदक्याचे फेरे फिरउन दावावे !
दोघांचा चालावा जेव्हां कुस्तीचा डाव
तेव्हां वाटे तुल्यबलाचे झुंजतात सिंह !
रणोपयोगी शिक्षण शाला तींतिल विद्यार्थी;
जमूं लागले एक जिवाचे स्नेही त्यां भंवती
शिंदे शिर्के पाटिल माने मोरे देशमुख
सकलांमाजी शोभुं लागली जोडी ती प्रमुख
वृक्षांमध्यें कदंब-चंदन, गरुड-हंस विहगीं
तारातारिं गुरु-शुक्र, शोभले तसे महाभागी
परोपकारी शांतगुणाचा निर्मत्सर ऐसा
सर्वांसच आवडे मुरारी शशांक कीं जैसा
प्रेमल-वचनीं तो वाटावा भ्राता सकलांना
परगुण-वर्णनिं तो वाटावा गुणज्ञ सुजनांना

## हिवाळ्यांतील सकाळ:—

ते सारेही मिळुनि एकदा शिकारिला गेले
धाडस चतुराई चपळाई यदेहीं खेळे
पूर्वद्वारीं सडा शिंपिला सुवर्ण-किरणांचा
नभीं रंगला अरुण-पीत नव समूह मेघांचा

शीत शीततर वाहत होता समीर आकाशीं
वृद्ध माणसें मुलेंहि दिसतीं दारीं शेकटिशीं
अर्ध्या भागीं पिवळीं किरणें, अर्ध्यावरि छाया
सुंदर सुंदर भूधर सजले दृष्टि दिलेभाया
कावळींत तनु वेष्टुन हातीं काठी घेऊन
गोपाळांचीं बाळें निघतीं गावकुसातून
पुष्पफलवती वसुंधरा नवतेजानें शोभे
कोण असा कीं सौंदर्यानें याचित्त न लोभे?
पेरूंच्या बागेवर कल-रव हिरव्या राघूंचा
बाधा बाधावरून घुमतो ध्वनि रखवालाचा
या बागेंतुनि त्या बागेवर विहगांच्या पंक्ती
गगनविहारी स्वैर धावती मधुर फळांसाठीं
कुठें ऐकु ये मळेकऱ्याच्या मोटेचा शब्द
कुठें लागलें गुऱ्हाळ तेथें चरकाचा नाद
शिरीं न्याहरी घेउनि धनिणी शेतामधिं जाती
कुणी एकटी दिसे, कुणाच्या मूल कडेवरती
पिकल्या बोरी लवल्या खालीं ताबुस बोरांनीं
उनाड पोरें बोरें खातीं पाडुनि दगडांनीं

**मृगया:-**

ऐशावेळीं मृगयेच्छूच्या टापा ऐकोन
सरिता-तीरीं तृषार्त हरिणें उभारिती कान

पर्वतमाला पर्वत-बाला[1] यांतिल वनभागीं
साग खैर बाभळी वाढल्या त्या जागोजागीं
काळविटांच्यामागें सुटले हय बाणासरसे
करवंदाच्या हिरव्या जाळ्या लपती त्यात ससे
झुडुपावरुनी ओढ्यावरुनी मृग वरती उसळे
तोंच शिकारी बाणासह तो भूमीवर लोळे
कुणी वराहामागें लागे, तरस कुणी छेदी
कुणी धावल्या वृकास भेदी, वनगज कुणी वेधी
शौर्यानें क्रूरता निजविली अजि मृत्युद्वारीं
परी तिची अंतींची उठली गुहेंत ललकारी!
जागविली वाघीण सोडिला चापाचा बाण
करालरूपिणि[2] जयवंतावर ये चवताळून!
तिची झेंप भाल्याची फेकहि एकच तैं झाली
परि फेकीसह घोड्यावरचा स्वार पडे खालीं!
क्रूर दैव हासलें, पसरिला काळानें जबडा
तोंच धावला वीर साहसी शिरक्याचा निधडा!
प्रेमाची बोलता मुखीं ये भाषा स्वार्थाची
आत्मयज्ञ-कुंडात परीक्षा होते प्रेमाची!

---

१ नदी २ वाघाचें विशेषण

३९६२१
ता. सि.




मर्मस्थानीं घाव घातले उसळून उसळून
तिनें [illegible] ची तनु रुधिरक्षीण !
गतप्राण ती व्याघ्री तिकडे, हा मूर्च्छित इकडे
जयवंताच्या नयनाश्रूंचे पडले तेथ सडे !

## यमुनेनें केलेली शुश्रूषा :–

घायाळाला कळली नाहीं निजस्थिती पुढची
उघडे दुसऱ्या दिनीं पापणी त्याच्या नेत्राची
उशास होता मित्र तयाचा, शेजारी यमुना
पुसे तिला–" जयवंत शरीरीं खुशाल आहे ना ?"
निजदुःखातहि स्नेहि-जनाची चिंता वाहावी
वाटे कीं ऐशाचीं गीतें कितीतरी गावीं
जयवंताचे अश्रु स्रवले सुरारच्या निटिलीं
तिचाहि गेला पदर साहजिक नेत्रांच्या पटलीं
कृतज्ञतेची वदे देवता उदारचरिताला
" प्राणाहुनि रक्षिलें जयाला, हा दादा बसला "
उठावयाला पाहे भरला ज्वर जरि देहात
" रहा निजोनी स्नेहभूषणा ! " वदला जयवंत
माता-भगिनी स्वकीय जनता होती मायेची
शुश्रूषा तरि अखंड चाले बहीण-भावाची

त्या तीघांच्या भिन्न भिन्न त्या हृदय-भावनांचें
कसें करावें वर्णन? जाळें जणुं तें किरणांचें
युवक तळमळे शय्येवरती युवती होरपळे
तद्दु:खाचें नीर तियेच्या लोचनांत खेळे!
पुसून डोळे निजांचलानें ती विगलित-गाली
मृत्युंजय-शंकरास चित्तीं नवसानें प्रार्थी!
रोमांचित करि तिच्या कराचा स्पर्शहि तत्तनुला
औषधाहुनी तिच्या कराचा गुण त्याला आला!
सौंदर्याच्या उद्यानातिल ती दिसतां हरिणी
त्या हरिणाच्या मुखीं हुषारी येई आढळुनि!
ती संजीविनि, ती अमृताची धारा, कल्पलता
क्लेशहारिणी यक्षिणि भासे त्या क्लेशव्यथिता!
तिच्या वाढले अनुरागाचे अंकुर सुकुमार
हिरवी हिरवी हृदयीं पसरे छाया चौफेर!
एकांतीं मानसीं उठाव्या प्रेमाच्या लहरी
त्या पोचाव्या अखंडतेनें कृतज्ञता-तीरीं!
"जरि त्या दिवशीं हा शिरक्याचा कुलभूषण नसता
भाउबिजेचा माझा राजा मज मुकला असता
कुलदीपच मालवला असता अमुच्या वंशाचा
मनोगतावर पडदा पडला असता शेवटचा

झाल्यें असतें निराश्रिता मी वनवासिनि आजी
आयु कसें कंठवलें असतें तरि विरहामाजी?"
उपकाराची फेड करावी कैशी दुबळ्यांनीं?
झाली आदरमयी मंगलाकांक्षेची राणी
फिरूं लागला होता आतां मुरार नवसाचा
यमुनेच्या मुखिं फुले ताटवा बहु संतोषाचा!



## भाग ४ था.

यमुना झोंपाळ्यावर बसून गोड गाणीं गात होती, इतक्यांत मुरारी आला. त्यानें 'जयवंत कोठें आहे ?' असें यमुनेस विचारिलें. तिनें सांगितलें कीं, 'नुकतेच मोरे आले होते त्याच्या बोलावण्यावरून तो त्यांजकडे गेला.' मोऱ्याचें नांव ऐकताच मुरार शंकित झाला ! मोऱ्याची कन्या मोहना ही मुरार शिर्के यांस द्यावी अशी मोऱ्यांची योजना चालली होती. ती चर्चा मुरारी यानें आपल्या घरीं ऐकिली व तसाच तो जयवंताकडे आला. त्याचा हेतु हा कीं, आपणास संमत नसलेली ही गोष्ट परस्पर जयवंतामार्फत आपण मिटवून टाकूं. पण जयवंतास आधींच मोऱ्यांनीं बोलावून नेलें हें ऐकून तो चमकला. यमुनेनें त्याच्या शंकेचें कारण विचारतां त्यानें आपले विचार व्यक्त केले. त्यांचें बोलणें होत आहे तों जयवंत आला व त्यानें मुरारीस 'मोऱ्यांचे जामात !' ह्मणून संबोधिलें. मुरारीस त्याचें बोलणें रुचलें नाहीं. त्यानें त्यास बाहेर फिरावयास नेलें व आपलें हृद्गत सांगितलें. त्या दिवसापासुन ती विवाह वार्ता निघेनाशी झाली. मात्र तेव्हांपासून यमुना व मुरार यांच्यातील प्रणय वृद्धिंगत झाला.

यमुनेचें गानमाधुर्य—

झोपाळ्यावर बसली होती यमुना सदनांत
देह झांकला होता नाजुक हिरव्या शालूंत
सस्यांकुरवति विमलरूपिणी वसुंधरा देवी
समीर-लहरींवरती वाटे कीं झोके घेई

श्रवणाल्हादी गीत-रम्य मैनेचा गोड गळा
फुलला जणु कीं द्राक्षलतेचा हिरवा गार मळा !
झुळझुळ वाहे मळ्यांत जैसें पाटाचें पाणी
आर्द्र करी चित्तास तशी तद्गीताची वाणी !
कोण अप्सरा गाते करिते अमृताची वृष्टी ?
रसिकांतरिं वाटे कीं आपण बघतों नव-सृष्टी !
कंठकलावति जेव्हां घेई श्रवणमधुर तान
तेव्हां वाटे लहरी आली पुष्पवनांतून !
सुंदर विलसे पारिजात कीं आम्रावलि विकसे
भिन्न ऋतूचा उद्गम तिचिया स्वरांतरीं भासे !
पूर्वेकडुनी पश्चिमेस ती झोके घेताना
शुभदर्शिनि जणु उषाच भासे नवतेजोवदना !
चंचल कुंतल, चचल अचल, चचल नयनेचे
नाजुक नाजुक अवयव दिसती मनोमोहिनीचे !
स्वकंठ-वीणांतरीं सरस्वति ती असतां मग्न
मुरार आला प्रमुदित झाला तिजला पाहून
जरा चमकली, किंचित् हसली, ती उतरे खालीं
रसिक ह्मणे मनिं मधु दृश्याची हानिच कीं झाली
ओसरलेला पदर आपुला बाला सावरिते
प्रीति-तारका विनय-घनांतुनि पुनः पुन्हा हंसते

## मोत्यांच्या मोहनेची माळः—

“ नसे कुणी का गेहीं यमुने ? कोठें जयवंत ? ”
“ आले होते मोरे त्यासह गेला इतुक्यांत ”
मोऱ्याचें ऐकतां नाव तो पडला संदेहीं
यमुनेनें पाहिली तयाची वर खालीं भुवई
“ कसला आला विचार ! शंका कळेल का मजला ?”
मृदु-कंठातुनि प्रश्न निघाला त्यानें आयकिला
ह्मणे—मुरारी “ कसें कथूं तुज कोमळ—हृदयेला
मनोरथाची माला तुटन्ते वाटतसे मजला
मोरे शिर्के यांचा यमुने ! शरीर-संबध
जरि घडला तरि तुटतिल माझ्या हृदयाचे बंध
निजलों होतों सदनीं कानीं आला आलाप
भास जाहला गेला काना जयळोनी साप !
तसाच उठलों चलित-मनानें आलों जों येथें
तुझ्या मुखानें कळलें गेला जयवतहि तेथें ! ”
विरह-कल्पना पसरुनि गेल्या चपलेच्या हृदयीं
क्षणभर तिचिया वदनांतोनी वच फुटला नाहीं
तिच्या मुखावर भाव उमटले गहन विचारांचे
कुशल चितारी काढू शकता चित्र न यमुनेचे

अंतर्वृत्ती झांकुन बोले परिमित शब्दांनीं
" आयकिली आह्मीही नव्हती वार्ता ही कानीं
मोन्यांची मोहना परंतू सुगुणाची खाणी
नाहीं का अनुरूप व्हावया शिरक्याची राणी ?
तेजोमतिला लाभुं नये का तेजस्वी भाग्य ?
हिरकणीस मोन्याचें कोंदण कवि ह्मणती योग्य."

## हृदयदेवीचा भक्तः—

तिनें लपविले मनोभाव जे अपुल्या नेत्रांत
शोधित होता आवरुनी तो निजचित्त भ्रांत
ह्मणे—" अप्सरा असो सुंदरा लाभो इंद्राला
हृदयदेविचा भक्त पूजितो आपुल्या देवीला
प्रीति-वंचना करून सुख का लाधे संसारीं ?
त्याहुन बरवें निवास करणें निर्जन-कांतारीं
सरितेचा वळविता कुणाला येइल कां ओघ ?
प्रीतीचाही तसा वळवितां येइल का ओघ ?
जी हृदयाच्या पवित्र सिंहासनावरी मूर्ती
आजवरी स्थापिली तिला का लोटू मी हातीं
कल्पनाच ही दुःसह वाटे बोंचतात काटे
कीं अग्नीच्या प्रदीप्त-कुंडीं तनु पडते वाटे

प्रेमि जनाला प्रेमी जनता परक्या देशांत–
आज साडिते निष्ठुरतेनें, गमतें चित्तात"
नौका बुडण्यापूर्वी तिजवर अशांतता जैशी
अकालवृष्टीपूर्वी कीं घन-संकुलता जैशी
किंवा धूसर धूसर छाया भूवर भेसूर
अंतःसृष्टीवरी तयाच्या तैसें काहूर
खालीं पाहत चरण-नखानें कोरित ती होती
झोंपाळ्याचा पदर एक तो दिसे तिच्या हातीं
त्याला वाटे दावावें हिज उघडोनी हृदय
परी न होई तद्वचनाचा कंठांतुनि उदय
ती तर मुग्धा मुग्ध जहाली उमटेना शब्द
एका खोप्यामधें पाखरें दिसलीं तीं स्तब्ध

शेवटीं जयवंतामार्फत तो प्रश्न मिटला:–

तोंच करातिल फिरवित काठी आला जयवंत
म्हणे विनोदें मुरारिला "मोन्यांचे जामात !"
तो हसला परि मित्र हसेना कांहीं बोलेना
जयवंताच्या मनांत आले तर्क तदा नाना
"मोहनेस तू, तुला मोहना अनुरूपच आहे
दोन्हि कुळाची तुल्य योग्यता लोकमुखीं वाहे

आम्ही तर हतभागी झालों राजाचे रंक
व्यक्त मनोदय मला न करवे आतां निःशंक "
"चल जाऊं बाहेर" सूचवी मुरार मानेनें
जातांना पाहिलें तयांना सतृष्ण यमुनेनें
विचारमग्ना बसे पुन्हा ती झोपाळ्यावरती
कंठीं एकहि विलसत नव्हती गीतांची पंक्ती
हृदयस्पर्शी दिव्यप्रेमी मुरारचरिताला
वाचित होती पुनःपुन्हां ती मान्यांची बाला
'मोत्यांची सारिली कुणास्तव तरि मोहनमाळ!'
प्रश्नाचा ध्वनि शिरला तिचिया अंतरांत खोल
जलपृष्ठावरि सरोजिनीचें दल जैसें हाले
नंदिनिचें आनंदी तैसें चित्त तदा डोले
महोदयाच्या महाशयाच्या सद्गुण-निकरांत
विलीन झाली, जैशी प्रतिभा सुंदर—काव्यांत

प्रेमवृद्धि —

विरून गेली वातावरणीं वार्ता लग्नाची
निघून गेली अनिष्ट लहरी झंझावाताची !
मुरार मानस-हंस तोषला यमुना-नलिनीचा
दैवाचा उपकारी झाला, याचक आशेचा !

हिरवी हरळी वाढे जैशी पाणथळ्या भंवतीं
किंवा कर्दळि वाढे जैशी जलबंधावरती !
तैशी त्यांची प्रणयाकांक्षा अतरात पसरे
वाहत होते सत्प्रीतीचे निर्मळ तींत झरे !
पूर्वीच्या दृष्टींत अतां नव जादू भरलेली
दृष्टि भेट होतांच तिच्या ये गालावर लाली !
सरलतेंत आदर लज्जेचा होय समावेश
त्रिगुणांचा तद्वदनीं शोभे तो संगम-वेष !
न कळत कोणा परस्पराना त्यांनीं पाहावें
अननुभूत हृदयानंदाचे प्रथमातिथि व्हावें ! ५२

# भाग ५ वा.

एके दिवशीं सकाळीं यमुना हातात दुरडी घेऊन फुलबागेत फुलें वेंचीत होती. तों तेथें मुरारी आला! त्यास पाहून यमुना लज्जित झाली. मुरारीनें यमुनेजवळ आपला प्रणयभाव व्यक्त केला. आणि विवाहाविषयीं तिची अनुमती विचारिली. तिनें सांगितलें "मी मनानें आपणास वरिलें आहे पण त्या वाडीच्या किल्ल्याभंवती माझा जीव घुटमळत आहे. माझ्या बाबांचा येथें वध झाला आहे, त्यांच्या मर्मभेदक किंकाळ्या अजून माझ्या कानीं घुमत आहेत, अशा स्थितींत त्यांच्या वधभूमीवर मी संसार कसा उभारूं? वाडीच्या किल्ल्यावर मान्याचा बावटा लावून आपण माझें पाणिग्रहण करा." मुरारीनें तिचें म्हणणें मान्य करून प्रतिज्ञा केली कीं, 'वाडीच्या किल्ल्यावर मान्याचा ध्वज उभारीन तेंव्हाच तुझ्या शरिरावर लग्नाचा साज चढवीन!'

## मुरारची प्रेमयाचना:-

एके दिवशीं दुरडी घेउन यमुना हातात
प्रातःकाली प्रवेशली निज-पुष्पवाटिकेंत
पारिजात निशिगध गुलाबहि याच्या जवळोनी
तुल्यभाव निज-गात्रांचे ती गेली दर्शवुनी!
डोलत होता भडक ताटवा लाल कण्हेरीचा
गुणगंधाविण देखावा जणुं केवळ रूपाचा!
नव कुसुमाच्या जाईजवळी कुसुमावति जाई
निजहृदयाच्या सुमावलीचा भास तिला होई!

मंद समीरें वाहत होता परिमळ पुष्पांचा
वाहत होता ओघ जसा तन्मनोविचाराचा!
फुलें वेंचता किंचित् सरला सरलेचा पदर
जणो उघडलें तेजोमतिच्या तेजाचें द्वार!
वळली यमुना तोंच दिसे तिज मुरारची मूर्ती
मनमोहन जरि परिचित होता तरि दचके युवती!
सौंदर्याची कंपित लतिका उद्यानीं हाले
तन्वीच्या रोमांच तनूवर उभारले गेले!
एका हातीं पदर धरोनी ती पाही खालीं
दुसऱ्या हातीं नव-कुसुमाची दुरडी भरलेली
"यमुने! पूजा-पुष्पें वेंचुनि झालीं इतुक्यांत?"
मुरारचा प्रश्न-ध्वनि शिरला तिचिया कर्णांत
"वेंचवतिल का सगळीं पुष्पें पुष्पवाटिकेचीं?
वेंचवतिल का विचार-पुष्पें फुलत्या हृदयाचीं?"
भावविकासी चेतोल्हासी रसिकेची वाणी
ऐकोनीया मुरार वदला प्रणयी वचनांनीं
"खरेंच यमुने! मध्दृदयाच्या फुलत्या बागेचीं
माझीं मजही नच वेंचवतीं फुलें विचारांचीं!
त्वत्प्रीतीचा प्रवाह वाहे अंतरांत माझ्या
मनोहारिणी कितीक जाई फुलति तिथें ताज्या!

दिधला चतुरे ! रुमाल जो तूं मजला प्रीतीनें
त्यावर केली मानस-पूजा माझ्या आशेनें !
त्यावर तव गे ! नाव वाचतां भाग्यलता-फुलली
भाति सुखाचीं मनोज्ञ चित्रें विविध मला दिसलीं !
मनोरमे ! संसारदेवता तुजला मानियलें
ऐश्वर्याचें मंदिर तुझिया भवतीं उभवीलें !
तूं संजीवनि सत्य जाहलिस मज मृत्यु-द्वारीं
जीवित-यात्रा सफल कराया समर्थ तू गौरी !
दिधलें अंतःकरण तुला मी, स्वामिनि तूं त्याची
माझी भवितव्यता भाविनी तव वचनीं साची !
जसे सागरातरीं हिमाचे राशि तरळतात
मदीयांतरीं धवल धवलतर हेतु विलसतात !
शीलवती ! तव शीलानें मम आकर्षित वृत्ती
तूं गुणशालिनि गुणलोलुप मच्चित्ताची शांती !
कर्तव्याची मद्ध्येयाची रम्य वीथिका तूं
भाग्याची वर्धिष्णु शशिकला शशांक-रूपिणि तूं !
असामान्य लोकोत्तर ऐशा पुरुषांची कीर्ती
स्त्री-भूषास्पद कीं विनयाची केवळ तूं मूर्ती !
रणदेवीला प्रबुद्ध करुनी, निज-बाहूंवरती—
नृपलक्ष्मीला मिरवित आणिन लालिते ! तुजसाठीं !

बलसागर कुणि असोत त्यांना मंथोनी समरीं
तुझ्या पदाशीं आणिन वैरी कृतघ्न अपहारी ! ”

**यमुनेची अनुमती, पण विव्हलता:—**

चित्ताकर्षक परिसत होती मुरारची भाषा
वाचित होती उज्ज्वल अपुल्या दैवाची रेषा
बोलाया तिज धीर न होई, पाही लज्जेनें
सुमतीची अनुमती मुखावर हसली लीलेनें
नृपलक्ष्मीच्या प्रियकन्येच्या आशा पालवल्या
शुभाननेच्या ओष्ठातूनी वचधारा स्रवल्या
“ मान्याच्या वंशावर आपण केले उपकार
निराश्रिताचे संकटिं झालां केवळ आधार
आपण केले व्यक्त आपुले विचार हृदयाचे
म्यां दावावें उकलुनि कैसें जाळें हृदयाचें !
या वाडीच्या किल्याभंवती घुटमळतो जीव
बुझवाया पाहतें, बुझेना पडलेला घाव
चढूं कशी बोहल्यावरी ? मम चरण कापतील
धरूं कशी मी माळ करीं ? मम हस्त कापतील
मी बाबांच्या वधभूमीवरि सुखकर संसार
कसा उभारूं ? पुसूं कशी तरि अश्रूंची धार ?

घरांतील तरवारी जेव्हां बाबांवर फिरल्या
ऐकाया येताती अजुनी कानीं किंकाळ्या !
त्या आक्रोशीं कसा रुचावा लग्नाचा गजर ?
नयनांचीं आंसवें गळोनी भिजेल हा पदर !
मनोमंदिरीं ज्यास पूजिलें मीं संतोषोनी
त्यावांचोनी मी जगताची झालें हो ! भगिनी
या दुर्गावरि मान्याचा ध्वज उभारुनी मग्नें-
करोत पाणिग्रहण, मदीया भाग्याचे राजे !
श्रीरामानें शिव-धनु भंगुनि सीतेला वरिलें
मत्स्य वेधुनी द्रुपद–सुतेला पार्थें परिणियलें
त्या भाग्याला मजला चढवा, चढवा कुलवंत
सौभाग्याचें कुंकू लावा भालावरि रक्त
अपुल्या कंठीं विजयश्रीची माला पाहोनी
भुजाश्रिता होईन करानें माला घालोनी !
त्या दिवशीं दादाला दिधलें प्राणाचें दान
द्या शौर्याच्या कळसावरचें मजला हें दान !"

**मुरारची प्रतिज्ञाः–**

विनयशालिनी प्रणयकांक्षिणी हितैषिणी तरुणी
तिला प्रतिज्ञा-बद्ध वदे शिरक्याचा वीर-मणी

बलसागर कुणि असोत त्यांना मंथोनी समरीं
तुझ्या पदाशीं आणिन वैरी कृतघ्न अपहारी! "

**यमुनेची अनुमती, पण विव्हळता:—**

चित्ताकर्षक परिसत होती मुरारची भाषा
वाचित होती उज्ज्वल अपुल्या दैवाची रेषा
बोलाया तिज धीर न होई, पाही लज्जेनें
सुमतीची अनुमती मुखावर हसली लीलेनें
नृपलक्ष्मींच्या प्रियकन्येच्या आशा पालवल्या
शुभाननेच्या ओष्ठातूनी वचधारा स्रवल्या
" मान्यांच्या वंशावर आपण केले उपकार
निराश्रितांचे सकटिं झाला केवळ आधार
आपण केले व्यक्त आपुले विचार हृदयाचे
म्यां दावावें उकलुनि कैसें जाळें हृदयाचें!
या वाडीच्या किल्याभंवती घुटमळतो जीव
बुझवाया पाहतें, बुझेना पडलेला घाव
चढू कशी बोहल्यावरी? मम चरण कापतील
धरू कशी मी माळ करीं? मम हस्त कांपतील
मी बाबाच्या वधभूमीवरि सुखकर ससार
कसा उभारू? पुसू कशी तरि अश्रूंची धार?

घरांतील तरवारी जेव्हां बाबांवर फिरल्या
ऐकाया येताती अजुनी कानीं किंकाळ्या !
त्या आक्रोशीं कसा रुचावा लग्नाचा गजर ?
नयनांचीं आंसवें गळोनी भिजेल हा पदर !
मनोमंदिरीं ज्यांस पूजिलें मीं संतोषोनी
त्यावांचोनी मी जगताची झालें हो ! भगिनी
या दुर्गावरि मान्याचा ध्वज उभारुनी माझें-
करोत पाणिग्रहण, मदीया भाग्याचे राजे !
श्रीरामानें शिव-धनु भंगुनि सीतेला वरिलें
मत्स्य वेधुनी द्रुपद–सुतेला पार्थें परिणियलें
त्या भाग्याला मजला चढवा, चढवा कुलवंत
सौभाग्याचें कुंकूं लावा भालावरि रक्त
अपुल्या कंठीं विजयश्रीची माला पाहोनी
भुजाश्रिता होईन करानें माला घालोनी !
त्या दिवशीं दादाला दिधलें प्राणाचें दान
या शौर्याच्या कळसावरचें मजला हें दान ! ”

शुराची प्रतिज्ञाः–

विनयशालिनी प्रणयकांक्षिणी हितैषिणी तरुणी
तिला प्रतिज्ञा-बद्ध वदे शिरक्यांचा वीर-मणी

“ अखिल मराठे कुळांत ज्यांची सत्कीर्ती मान्या
मान्यांच्या त्या वीर-कुलाची तूं कन्या धन्या
लाविन वाडीवरी बावटा जेव्हां मान्यांचा
सौभाग्याचा रक्त तिलक तुज लाविन वैऱ्याचा !
स्थापिन सिंहासनिं मान्याचा जेव्हां युवराज
चढविन तेव्हां तुझ्या शरीरीं लग्नाचा साज !
विजय-मार्ग मम संकट-भीती यांनीं भरलेला
दिसेल विजयी बाहु परी अरि-रुधिरें भिजलेला !
सैन्य नको मज, मित्र पुरे मम शूर जातिवंत
कार्यसिद्धि सत्वांतरिं वसते, नच साहित्यात
तुझे तसे माझेही हसविन पूर्वज गगनांत
पवार पूर्वज रडविन निर्वंशाच्या दुःखांत ! ”
प्रसन्नवदना अविचल-नेत्रीं होती पाहात
निघून गेला शौर्याचा कीं प्रणयाचा स्रोत. ४९

## भाग ६ वा.

मुरार वाडीचा किल्ला घेण्याच्या उद्योगास लागला. त्यानें आपला मित्रसमूह जमविला. होळी विझल्यावर अमावास्येच्या काळोखात किल्ला सर करण्याचा त्यानें आपला बेत सर्वांस सांगितला. त्या दिवशीं प्रत्येकानें आपापले लोक मदतीस आणावयाचे कबूल केलें.

शिवरात्रीस रुद्रेश्वराची यात्रा भरली तेथें यमुना ही मुरारीचा नवस फेडावयास गेली असता पवाराच्या युवराजानें ती लावण्यलतिका पाहिली. दुसऱ्या दिवशीं यमुनेला पवारांनीं मंत्र्यामार्फत मागणी घातली, ती जयवंत व मुरार यांनीं अव्हेरिली. पवारमंत्री अपमानानें संतप्त होऊन निघून गेले.

### प्रतिज्ञापूर्तीचा उद्योग:—

गुप्त मडळ्या जमूं लागल्या शैलारण्यांत
स्वातंत्र्याचीं गीतें घुमलीं पर्वत—कुहरांत !
मान्याच्या वंशाचे होते जे जे अभिमानी
जयवंताच्या पुढतीं मुजरे करिती येवोनी
स्वामिभक्तिचे पुत्र तयांचा मुरार आचार्य
रणदेवीच्या उपासकांचा तोच उपाध्याय
भिल्ल तसे वनचरही झाले त्याचे सांगाती
चित्त-विलोभन करणारे तद्गुण सारे गाती

त्यांनीं स्फूर्तिप्रद ऐकावें त्याचें व्याख्यान
निजप्रभूचें दैन्य विलोकुनि व्हावें बेमान !
परवशतेची रक्षा केव्हा फेकूं गगनांत
ध्यास लागला हाच सर्वदा त्याच्या चित्तांत !
केव्हां कोठें कसा करावा जोराचा हल्ला
मुरार अपुली युक्ती सांगे जिंकाया किल्ला
" विझेल होळी, अंवसीचा जैं पडेल काळोख
घोरपडीनें चढविन माझे मी शभर लोक
किल्ल्याच्या दरवाजापुढतीं राहिल जयवंत
दार उघडतां तुह्मी शिरावें 'हर ! हर !' घोषांत
नववर्षाच्या नव्या दिनीं उभवितील लोक गुढ्या
आपण उभवूं मान्यांचा ध्वज घालुनि तेथ उड्या !"
चिंचपुराचे शिंदे वदले—" वीस लोक माझे—
साह्याला आणीन लढाऊ रक्ताचे ताजे ! "
मिलवाडीचा नायिक बोले कीं—" माझ्या हातीं—
शंभर असती एकदिलाचे जीवाचे साथी ! "
सोथगावचे पाटिल वदती—" माझ्या लोकाची—
करून देइन केव्हाही शिर-गणती तीसांची ! "
घोरपडे थोरात मोहिते जाधव देशमुख
मान्याही पाठीशीं होते लढवय्ये लोक

फिरूं लागले वाडीभवतीं मुरारचे हेर
कळूं लागल्या गुप्त बातम्या त्याला बाहेर

**रुद्रेश्वराची यात्रा:–**

शिवरात्रीची यात्रा भरली श्रीरुद्रेशाची
पुण्यक्षेत्रीं जनता थळली भाविक–चित्ताची
'जयशंकर! जयशंकर!' नादें गिरि-वन दुमदुमलें
संसारी-जन ईश्वर-भजनीं दिसती रमलेले
सोननदीच्या तलावात कुणि करिताती स्नानें
शिवलिंगावर कुणी वाहती बिल्वाचीं पानें
रुद्राचा अभिषेक चालला वैदिक विप्रांचा
सभोंवतीं दरवळला परिमल पूजा-द्रव्यांचा
शंखांचा घंटांचा घुमला प्रतिध्वनी तेथें
नादब्रह्मीं शैव सेविती शिव-तन्मयतेतें
भस्म विलेपुनि चंदन चर्चुनि शंकर-भक्ताचे
शिवलीलामृत-पाठ चालले इच्छित हेतूंचे
कैलासाचा नाथ पावला ज्यांच्या नवसाला
युवयुवती व्रतदिनीं पूजिती प्रभु रुद्रेशाला
त्यांत सुंदरी कुणी नवोढा होती बसलेली
शाळुंकेवरि बिल्व- दलांची वाही लाखोली

नीलकंठ-शीर्षींची धवला चंद्रकला काय ?
किंवा प्रगटे शिरोविहारिणि भागीरथि काय ?
त्या स्थानाची पवित्रता ती युवती-रूपानें
जनदृष्टीला मोहित होती निसर्गरूपानें !
तरुण-नेत्र जरि सांठविती त्या रूपसुंदरीला
ती निजनेत्रीं परी सांठवी गिरिजा-नाथाला !
लोकसागरामधील पद्मिनि यमुना अभिजात
तिच्या सभोंती स्वैर पसरला दृग्लहरी-व्रात !
निमीलिताक्षी शिवप्रार्थना करि अंतर्यामी
" मुरारचा हा नवस फेडिलें प्रभो ! तुझ्या धामीं
भक्तकामकल्पद्रुम देवा ! पदर पसरितें मी
भिक्षा घाला पुन्हा एक मज कैलास-स्वामी
सच्छीलाच्या कर्तव्याला यश द्या शशिमौली
श्रावण-मासीं प्रतिदिनिं वाहिन तुम्हास लाखोली
रक्षुनि मत्सौभाग्य वाढवा बंधूचें भाग्य
करीन सोळा सोमवारचें व्रत देवा ! योग्य
भोळा शंकर जनहित-तत्पर तव ऐसा महिमा
उत्कट मद्भक्तीची देवा ! तूं जाणसि सीमा

पवार युवराज—

भक्ति आणि सुंदरता यांचा जो संगम झाला
संत साधु सज्जनांतरींही अपूर्व तो गमला

पूजा सरली, रमणी उठली, हृदयें चळवळलीं
विप्रांना वाटली दक्षिणा तरि गर्दी झाली !
मुरार चाले पुढें, मागुनी बंधुसखा चाले
मधें तिच्या शालुची किनारी भूमीवर घोळे
तोंच पुढारीं तिघास दिसला पवार--युवराज
अपहारी सत्तेचा ज्याच्या डोळ्यावर माज
बहार वृंदावन-वृक्षाचा केवळ शोभेचा
तसा तयाचा वेष दिसे गुणकला--विहीनाचा !
गंधहीन कीं पलाशतरुचा केवळ देखावा
रसिक मनाला सेव्य कसा तरि सांगा वाटावा ?
त्यास पाहता जयवंताच्या नयनिं चढे लाली
मुरारच्या दोन्ही भुवयामधिं दिसे वळी पडली !
ज्वलद्गिरी भडकले दोन ते उष्णच्छ्वासाचे
सिंधु खवळले दोन भयंकर अंतर्लहरीचे !
पाषाणाला घालुनि वळसा निर्झरिणी जाई
यमुना तैशी वांकुन जाई मागें ना पाही
मशक वांछितो दुर्गति नेणुनि तेजोज्योतीला
अविचारी अहि-शीर्षमण्याचा लोभी तो झाला !
सभ्यरीति कीं शिष्टपद्धती ही जीची सुटली
ग्रामकवीच्या कवितेसम तद्दृष्टि तदा दिसली !

बार न उठला, इंजक प्याली ऐशी जी तोफ
सदृश तियेच्या मुरार जिरवी बहु अत.कोप !
ओठ चावला धुरंधरानें मानहि हालविली
निश्चयातल्या कर्तृत्वाची भाषा ती गमली

**वार्ताविनोद:—**

पथिं दोघाचा विषय चालला तोच विनोदाचा
मुरार होता विषय मात्र यमुनेच्या दृष्टीचा
"गडावरोनी उद्या मागणी अमुच्या ताईला—
येइल बहुधा;" जयवतानें विनोद हा केला
"इश्श ! काय बोलतोस दादा ! कुलजा मान्यांची
कुलवंताविण होइल कधिं का भार्या नीचाची?"
बाल-मृगाक्षी हास्य-कटाक्षें मुरारिला पाही
स्वयंवराची माला जणु ती तत्कंठीं वाही !
पुन्हा विनोदी बधु वदे—"तव वाणी ओजस्वी,
तेजस्वी शिर्क्यांची भावी राणी तेजस्वी !"
हंसुन ह्मणे ती—"उगा रहा, तूं पुन्हा न बोलावें
स्त्रियांस वचनीं पुरुषानीं किति साग लाजवावें ?"
कळलें त्याना कीं, आलों जरि आपण वेशीला
सरला कैसा मार्ग कळेना वेळ कसा गेला !

**पवारांची यमुनेस मागणी !–**


गळवाडें गावांत आज ही वार्ता चर्चेची
आली कीं यमुनेस मागणी पवार राजाची
जलभरणाला पाणवठ्यावर जमलेल्या युवती
योग्य न ही मागणी ह्मणोनी माना फिरवीती
वृद्ध बोलती घरोघरीं कीं " वाघाची लेक
दुष्ट दाडगा आज लांडगा मागे बिनधोक ! "
पवार-मंत्री जयवंताच्या सदनीं बसलेले
गळवाड्याचे वृद्ध पुढारी तेहि तिथें जमले
मुरार दिसला निराळाच तो उग्ररूप आज
डोळ्यांतुनि जणु उसळी घेई त्याचें नव-तेज
" पवार-माने याचा व्हावा अभिमत संबंध ! "
जयवंतानें प्रथम ऐकिला मंत्र्यांचा बोध
मातुल आणिक वृद्धजनांच्या मुखाकडे पाही
प्रदीप्त-कोपें तच्चित्ताची जरि झाली लाही
असंमतीचा भाव जाणुनी वक्ता वेधक तो
कुलाभिमानी अपमानाच्या त्वेषानें वदतो
" ज्यानें त्यानें अपुली पदवी जाणुन वागावें
सुजनाच्या डोळ्तील माना ऐसें बोलावें

दिली भाकरी, दिली चाकरी राबावें ज्यांनीं
मागावी का निजप्रभूची कन्या दासांनीं?
आज्ञापुढतीं येउनि ज्यांनीं लववावी मान
जामाताचा का वाछावा त्यांनीं बहुमान?
ढाळित होते काल अम्हांवर जे चवऱ्या हातीं
आज ढाळुनी घेती चवऱ्या ते अपुल्यावरती!
दगलबाज विश्वासघातकी धन्यावरी उठले
रचून पर्वत पापाचे या पर्वतात नटले!
स्वामिद्रोही अशा नरांच्या कुलास धिक्कार
कोण अशाच्या कंठीं कुलजा घालिल हो हार?"

**पवारमंत्री व मुरार शिर्केः—**

मंत्री सर्जेराव बोलले—"पुरे करा कोप
तुमचीं वाक्यें तुह्मास देतिल हीं बहु अनुताप!
पडत्याकाळीं श्रेष्ठजनाश्रित व्हावें हें उचित
परि दुर्दैवी तरुणाना कुणि दावावा सुपथ?"
मुरारिनें निज मौन सोडिलें निर्भय तो झाला
कंठ तयाचा मान्यांच्या अभिमानानें भरला!
"अनुतापाची घटिका पुढची तुमची कीं अमुची
कशी कथावी भविष्यवाणी कोणीं कोणाची?

कापियली ज्या दिनीं तयांनीं मान्यांची मान
त्या दिनिं का तुह्मि दिला धन्याला श्रेष्ठांचा मान?
कुठें मारिल्या किती लढाया तुमच्या स्वामींनीं
श्रेष्ठपणाची एक गोष्ट तरि ऐकूं द्या कानीं ?
नसे मागणी, असे डागणी ही दु:खावरची
नांदलीं न चिरकाल कुटुंबें जगिं उन्मत्तांचीं
बटीकही मान्यांची ज्यांना लाभणार नाहीं
कोण तयांची धृष्ट मागणी ऐकोनी घेई ?"
'बरें !' ह्मणोनी मान हालवी, निघून तो जाई
सर्वांना वाटलें मनीं हें चिन्ह बरें नाहीं. ७५



# भाग ७.

आता वेळ घालविण्यांत अर्थ नाहीं, असा विचार करून मुरारीनें जीवास जीव देणाऱ्या आपल्या साथीदारांस सूचना केली रात्रीं डोंगराच्या एका दरींत मुरार, जयवंत व त्याचे साथीदार यांचा जमाव जमला. त्यांत निश्चय झाला कीं, उद्यां रात्रीं किल्ल्यावर हल्ला करावयाचा त्यांच्या या गुप्त सभेची बातमी ठेवून पवारांच्या घोडेस्वारांनीं त्या रात्रीं ऐनवेळीं त्यांजवर छापा घातला! चकमक झाली, जो तो घाव घालीत निघून गेला, जयवंत मात्र हातीं लागला! त्याला त्या स्वारांनीं कैद करून किल्ल्यावर नेलें. सकाळीं चौकशी करून पवारांनीं त्यास राजद्रोही ठरविलें व कडेलोटाची शिक्षा दिली! ती दुसऱ्या दिवशीं अंमलांत यावयाची होती यमुनेला ही अनिष्ट वार्ता कळून तिनें अत्यंत शोक केला. मुरारी त्या रात्रीं छाप्यातून निसटला तेव्हांपासुन त्याचा पत्ता नव्हता. त्यानें आपले लोक जमा केले आणि त्याच दिवशीं शिक्षेच्या आदल्या रात्रीं घोरपडीच्या साह्यानें किल्ल्यावर चढून हल्ला केला! त्याने पवारास त्याच्या पुत्रासह ठार करून जयवंतास कारागृहातून सोडविलें आणि सकाळीं वाडीच्या किल्ल्यावर मान्यांचा ध्वज उभारिला!

## जयवंत पवारांच्या हातीं सांपडला!—

रंगपंचमी गली, झाला सण तो लोकाचा
मुरारचा रण रंगाचा पारि उत्सव अंत्रसीचा
स्फूर्ति तयाची त्यास बोलली, हो सावध शूरा!
काळ घालवूं नकोस होइल विफल हेतु सारा

काढ तुझी ती म्यानांतूनी विजयी तरवार
धाडीवर उडि घालुनि उतरीं पाप्याचा भार
शत्रूच्या आघातापूर्वी तूं कर आघात
घालविली संधी तर होइल आशेचा घात ?
गुप्तसभेची वेळ कळविली दूतानीं सकळां
धैर्यधराच्या दरींत जमला रात्रींचा मेळा
माणसास माणूस दिसेना ऐसा अंधार
नभीं मात्र तेजाच्या ठिणग्या तारा चौफेर
इकडे डोंगर, तिकडे डोंगर, डोंगराळ जागा
ध्येयाच्या तळमळींत असतें भय कोणा सांगा ?
रातकिड्याच्या अखंड नादीं वायूचा नाद
वन्यपशूचा ऐकू येई मधून पडसाद
उद्यां जिवावर उदार होउन कमरा बांधाव्या
मुरार बोले, शौर्य-परीक्षा गडावरी द्याव्या
बाहु स्फुरले, निश्चय झाले, शपथाही झाल्या
अपरात्रीं घोड्यांच्या टापा कानावर आल्या !
कार्यसफलतेपूर्वी केला देवानें घात !
कळसावर चढणार, जाहला तोंच अधःपात
धारेमध्यें खडक लागला नौका आदळली
तैशी गति जाहली, तयाचीं हृदयें धडधडलीं

सकेताची शीळ वाजली गजबजलें स्थान
लाल जहाले काळ्या रात्रीं काळे पाषाण
कुणी निसटला घाव घालुनी, कुणि चढला वरती
हार विखुरला माल लागला राजमणी हातीं !
बांधुनि त्यांनीं जयवंताला वेगें चालविलें
स्वारांचा आनंद वाढला, वाडीला गेले
ती वाडीच्या घोडदळाची नामांकित टोळी
दुर्गद्वारीं तिनें जयाची दिधली आरोळी !
मृगराजाचा छावा धरिला नेला व्याधांनीं
कीं मान्याचा हिरून नेला कुलमणि दुष्टांनीं !
मुरारच्या मित्रप्रेमाचा गिरिवर कोसळला
यमुनेच्या बंधुप्रीतीचा सागर कीं सुकला !
भव्य मनीषा आशा इच्छा विविध मनोवल्ली
अग्निकणाची वृष्टि त्यावरी जणो प्रखर झाली !

**जयवंतास देहान्त शिक्षा व यमुनेचा शोकः—**

दुसऱ्या दिवशीं गळवाड्याचे हळहळती लोक
होय अनावर कुमारिकेचा यमुनेचा शोक !
मुरार गेला कुठें कळेना, त्याच्याही सदनीं
चिंतेचें साम्राज्य भयंकर गेलें पसरोनी !

दोनप्रहरीं अनिष्ट वार्ता ऐकाया आली
जयवंताला म्हणती शिक्षा मृत्यूची ठरली !
उद्यां सकाळीं अवाईच्या भव्य कड्याहून
जयवंताला ढकलुन त्याची तनु करितिल चूर्ण !
त्या भगिनीला जेव्हा कळली भीषण ही वार्ता
तिनें आपुल्या शोकें केली जनता दुःखार्ता !
"दादा ! झाली गति ही कैशी तव आयुष्याची
माझीही गति होईल कैशी अनाथ अबलेची ?
तूं मातें स्मृति घडूं न दिधली जननीजनकाची
भाऊराया ! मजवर छाया केली मायेची !
किती उराशीं ऐश्वर्याच्या आकांक्षा वरिल्या
हवेंत जणु बांधिल्या मनाच्या माड्या त्या पडल्या !
आतां सरला मान्यांच्या वंशाचा इतिहास
दैवानें टाकिला कुळावर शेवटचा फास !
व्याघ्रीच्या दाढेंतुन तुजला काढियलें ज्यांनीं
कसें तयांना पाहवलें तुज नेतां शत्रूंनीं ?
तुला न कोणी स्नेहि, एकला तुझाच तूं अंतीं
संकटकाळीं कोणि कुणाचा नसतो सांगाती !
तुला कड्याच्या टोंकावरती जेव्हां नेतील
खोल मृत्युची गुहा भयंकर जेव्हा बघशील--

तेव्हां दादा तुझ्या शरीरीं येतिल जे काटे
ते आठवता आजच माझें हृदयातर फाटे !
अभागिनीची या भगिनीची स्मृति होइल तूंतें
बद्धकरांनीं पुसशिल तेव्हा आर्द्र लोचनातें !
मुक्या मनाचा कथिशिल मातें तूं जो संदेश
पूर्ण नसो परि कसा कळावा मजला अल्पांश ?
पुन्हा मागणी करून माझी, तुजसि जीवदानीं
मोहितील बहु वैरी, विवश न होशिल अभिमानीं !
तुझ्या मागुतीं मी न एकटी राहिन या जगतीं
कुलप्रतिष्ठा राखुन येइन भेटाया वरती ! "
दुःखितेस त्या कुणीं कसें तरि तदा शांतवावें
दग्धलता जी झाली तीतें कसें जीववावें ?

**मुरारीचा किल्ल्यावर हल्लाः—**

निशीथ-समयीं काळोखाचा धरणीवर पूर
चोहिंकडे स्तब्धता पसरली काळी भेसूर !
किल्ल्याच्या बुरुजा बुरुजावर घुमते अलबेल
दैव हासतें सावधतेचा पाहोनी खेळ !
अंकाईचा कडा भयानक दुर्गम विल्यात
जेथुन होई राजद्रोही देहाचा पात !

३१९८३



निसर्गनिर्मित कृष्णशिलामय विशाल रचना ती
तिकडोनी कोणाची न्हती चढण्याची छाती
निर्धाराशीं जेंव्हां संगति दैवाची घडते
अशक्यतेच्या पोटीं कौतुक जन्माला येतें !
त्याच कड्याच्या खालीं जमले काळाचे वैरी
घोरपडीनें मुरार चढला पवार-बलहारी !
सोलाजवळी सोल लटकले चढले नरवीर
नंतर झाला रुद्रेशाच्या नांवाचा गजर !
त्या गजरानें जागा झाला तो गड गडबडला
मुरारिनें तोफांवर हल्ला पहिल्यानें केला !
तिथें यशाचा विडा उचलला केली चपळाई
वाजत होती नौबत, तिजवर उसळोनी जाई !
नेकजात गडकरी लढाऊ उभारुनी बाहू
रणतीर्थावर सजले सारे रक्तानें न्हाऊं !
मानकरी तरवारबहाद्दर त्यांच्या समशेरी
भिलवाडीच्या समशेरीसह नाचति अधारी !
खणाखणी जाहली उडाल्या चिळकांड्या भंवती
कितीक पडलीं प्रेतें तिमिरीं करवेना गणती !
पोत पेटले जिकडे तिकडे प्रकाश संचरला
युद्धक्षेत्रीं तदा आपपर-भाव उदित झाला !

महारुद्र-सचार जाहला मुरारच्या देहीं
तत्खड्गाची रक्त-पिपासा परितृप्त न होई !
रणशिंगें वाजती शिपाई लढती त्वेषानें
धारकऱ्याच्या टोळ्या येती नव्या उमेदीनें !
जाधव वेगें गेले, झाले दरवाजे उघडे
धावत आले मुरारच्या साह्याला घोरपडे !
नव्या दमाची नवी चढाई करिती घोरपडे
ईर्षा चढली, लढत लागली, पडले लाल सडे !
शिर्क्यांचा वीरोत्तम शोधी उदो पवाराला
त्यास पाहता ठिणगी शिवली जणु कीं तोफेला !
विद्वानाची होय परीक्षा पहिल्या वाक्यांत
शूराचीही होय परीक्षा पहिल्या तडफेंत !
धडाडिनें तो उसळी घेई गजावरी सिंह
समरगुणाची चमत्कृती ती प्रेक्षणीय नव्य
चपल नागिणी समान त्याच्या नाचति तरवारी
मर्मस्थानीं डसूं पाहती तेव्हा निर्धारीं !
पवार-कंठीं अचूक पडला शिर्क्यांचा वार
आणि उतरला वाडीवरचा पापाचा भार !
तदा उदाजी-पुत्र पातला समराहुति द्याया
विनाशकाली कुणी कुणास न शक्त निवाराया

एकच दिसला तद्रुण नेत्रीं युद्धावेशाचा
प्रकट न झाला शौर्याचा गुण खंडित देहाचा !
जनकाच्या प्रेतावर पडलें पुत्राचें प्रेत
विजयी योद्धा तेथुन वळला विजयी घोषांत !
जेथें होता मित्र तयाचा प्रेमी जयवंत
कारागृहिं तो प्रवेशला अरिरुधिरानें लिप्त !
दोघेही कडकडुन भेटले आनंदीं रडले
मुरारिनें मित्राला स्वकरें बंधमुक्त केलें !
त्या दोघांच्या आनंदाचें वर्णन करण्याला
समर्थ नाहीं सत्य कवीच्या वचनाची माला

किल्लयावर मान्यांचा ध्वज फडकला ! —

पवार पडले धारातीर्थी कळलें सकलांला
स्वप्राणाची भीती उरली मग ज्याला त्याला
कोणी पळती, जीव लपविती, शरण कुणी येती
तोफांची जयसूचक झाली धडडड सरबत्ती !
त्या नादानें दिग्मंडल तें निनादुनी गेलें
उसळुन उठले व्याघ्र सिंह तैं कुहरांशीं आले !
पूर्व दिशेचें द्वार रंगलें, उषा हसे गालीं
तिजही त्या विजयानंदाची कीं लहरी आली

प्रभात-वायू शीतल शीतल होता वाहात
वन-विहगांचे समूह गाती मजुल नादात
दिसला भव्य-ध्वज मान्यांचा वाडीवर जेव्हां
आनदानें विस्मित झाले जन सारे तेव्हा
सूर्यानें अभिनंदन केलें सहस्र किरणांनीं
मान्याचा 'विजयोऽस्तु' गाजला दिशादिशांतूनी
दुदुभि वाजे, भेरी गर्जे गभीर नादानें
गेला शैलप्रदेश भरुनी जयमागल्यानें ७२



## भाग ८.

सकाळीं आपल्या भावाचा कडेलोट होणार म्हणून यमुनेला [illegible] रात्र वैरिणी सारखी वाटली; पण अर्धी रात्र संपून जेव्हां किल्ल्यावर युद्धाची धुमश्चक्री माजली, मशाली पेटल्या, रणवाद्यें वाजूं लागलीं, तेव्हां तिला वाटलें कीं, ही मुरारची प्रतिज्ञापूर्ति [illegible] वेळीं [illegible] तोफा धडाडल्या. सकाळीं मान्याचा ध्वज किल्ल्यावर फडकत होता तो तिनें पाहिला. तिच्या आनंदाला सीमा नव्हती, तोंच किल्ल्यावरील पालख्या तिला नेण्याकरितां आल्या. ती पालखींत बसून वर गेली. तिघांच्या भेटी झाल्या. या आनंदसमयीं जयवंतानें यमुनेचा हात मुरारच्या हातीं दिला! पुढें वैशाखात दोघाचें लग्न लागलें.

### यमुना व ती युद्धाची रात्रः—

अर्ध रात्र वैरिणीसमानचि गेली यमुनेची
दु:खानें जी छळना केली तिज ठाउक तीची
मध्यरात्र संपून गडावर झाला कल्लोल
रणवाद्यांच्या नादानें तन्मन झालें लोल
दाराजवळीं येउन येउन उत्सुक नयनानीं
गडाकडे ती पाही घोषहि ऐके कानानीं
स्मशान-हृदयीं मृत आशांना आलें चैतन्य
दग्ध मनाला मृदु मृदु अंकुर फुटले सुखजन्य!

किती मशाली धावत होत्या ती पाहत होती
किति रणवाद्यें गर्जत होतीं, ती ऐकत होती
निजप्रतिज्ञाबद्ध अशा त्या वीरश्रेष्ठानें
काय साधिली असेल वेळा त्या रणसिंहानें ?
माझ्यासाठीं दादासाठीं उल्लंघुन कोट
लढत असावा तोच उभारुन छातीचा कोट!
वाढत गेला जसा रणाचा दुर्गीं आक्रोश
मनोमनीं शिवनामाचा करि कुमारिका घोष!
धडाडल्या विजयाच्या तोफा बुरुजावर जेव्हा
धडधडलें काळीज अहाहा! हरिणीचें तेव्हां
ती भयचकिता शंकानिरता वनिता घाबरली
कंपवतीनें दाराची झणि फळी करें धरिली!
परि प्रभाती मान्यांचा ध्वज ती पाही जेव्हां
आनंदाचा ध्वज डोले तद्‌दंतरीं तेव्हा!

**यमुनेचें पाणिग्रहण –**

वाडीच्या पालख्या उतरल्या शिरल्या गांवांत
यमुनेला घेऊन चालल्या स्वजन–समूहात
ग्राम-सुंदरी सुशील-ललना तिजला गौरविती
वदती–" यमुने! तुवांच केली वाडी भाग्यवती!"

दुर्गद्वारीं प्रवेश झाला पार्थिव-दुहितेचा
तिथें तिला सन्मान लाभला पूर्वैश्वर्याचा !
दादाला कधिं पाहिन चित्तीं तिज वाटत होतें
मुरारच्या तर दर्शनास मन उत्कंठित होतें !
ते दोघेही राजमहालीं बसले असतांना
वाहनिकेचा पडदा सारी हातानें यमुना !
प्रीति-देवता हंसली गेली बंधूच्या जवळीं
मुरारिला पाहुनी प्रणयिनी लज्जानत झाली !
तो सौख्याचा आनंदाचा दिन तो भाग्याचा
नच एकाचा त्रयवर्गाचा होता नवसाचा
तिघांतुनी जयवंत बोलला अपुल्या मित्रासी
" मुरार ! त्वा अजि वश चढविला कीर्तीच्या कळसीं
शिरक्याचे कुलपुरुष जाहले स्वामिभक्त शूर
त्यात उदारा ! तुझे फिटावे कैसे उपकार !
तुझी थोरवी कशी मुखानें मी माझ्या गाऊं ?
सत्यव्रत तू, तुला देणगी काय तरी देऊं ?
जननि जनक दोघांच्या मागें ही माझी भगिनी
हृदयाच्या जणु फुलासारखी वागविली भुवनीं
कुलभूषण तूं, तुला अर्पितो तेंच फूल आजी
अमोल याहुन वस्तु न दाया तुला जगामाजीं !

देवाना पितराना स्मरुनी मंगल कालांत
हा भगिनीचा हात देतसे तुझिया हातांत ! ”
करितो पाणिग्रहण प्रणयी मुरार यमुनेचें
किती विकसले बाग तयाच्या मनिं आनंदाचे !

विवाहानंद :—

गाजत आला वैशाखाचा लग्नाचा महिना
यथाविधीनें सून जाहली शिर्क्यांची यमुना
मोऱ्याची कन्यका मोहना होती दैवाची
भावजयी यमुनेची झाली, राणी राजाची.
मान्यासाठीं तळहातीं शिर घेवोनी लढले
ते मानाच्या महत्पदावरि अधिकारी झाले !
अमित जहाले तेथें उत्सव राजैश्वर्याचे
मुरारचे गुण वर्णन करिती शाहिर वाडीचे
अजून देतो पूर्वस्मृति तो वाडीचा किल्ला
मान्याच्या यमुनेचीं गीतें लावी गायाला

समाप्त.